S.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
Mumbai – 400 020.
Phone : +91 22 2203 1879

A+ Grade (CGPA 3.27)

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

# जाहिरात

## भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार – सन २०२५-२६

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्यामार्फत भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ, विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती वा संस्थांकडून पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत आहेत:

कार्यक्षेत्र खालीलपैकी एक किंवा अनेक

- शिक्षण, सामाजिक कार्य/ सामाजिक समस्या निवारण
- महिला सबलीकरण, अर्थकारण
- प्रशासन, संरक्षण, विज्ञान आणि संशोधन

पुरस्काराचे निकष, सविस्तर नियमावली आणि अर्जाचा नमुना विद्यापीठाच्या www.sndt.ac.in या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

पूर्ण भरलेला अर्ज, आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या व पुराव्यांसह **०२ (दोन) प्रतींमध्ये** सादर करणे अनिवार्य आहे.

अर्ज अंतिम दिनांक **२२ जून २०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत** किंवा तत्पूर्वी कुलसचिव, एसएनडीटी महिला विद्यापीठ, १, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यू मरीन लाईन्स, मुंबई – ४०० ०२० येथे कार्यालयीन वेळेत सादर करावा.

**टीप:** विहित मुदतीनंतर प्राप्त झालेल्या अर्जाचा किंवा अपूर्ण अर्जाचा विचार केला जाणार नाही. पुरस्कार वितरण करण्याबाबत सर्व अधिकार विद्यापीठ प्रशासनाकडे राहतील.

**कुलसचिव**
**एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई**

E:\naresh\Year 2026\Marathi Letter 2026.docx

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ**

**१ एन. टी. रोड, न्यू मरीन लाईन्स, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०**

**भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार-२०२५**

**सविस्तर नियमावली व मार्गदर्शक तत्त्वे**

---

## प्रस्तावना

सामाजिक प्रगतीसाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मान करण्यासाठी **"भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार-२०२५-२६"** प्रदान करण्यात येईल. हा पुरस्कार पारदर्शकता, वस्तुनिष्ठता आणि कायदेशीर शिस्त राखण्यासाठी ही नियमावली लागू राहील.

---

## संक्षिप्त नाव व अंमलबजावणी

१. सदर नियमावली **"भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार-२०२५-२६"** म्हणून ओळखला जाईल.ला

२. नियमावलीतील तरतुदी सर्व अर्जदार, समिती सदस्य यांच्यावर बंधनकारक राहतील.

---

## उद्दिष्टे

- वंचित गटाच्या सक्षमीकरणासाठी सातत्यपूर्ण कार्य करणाऱ्यांचा गौरव करणे.
- समाजात महिला शिक्षण व सामाजिक समतेची जाणीव निर्माण करणे.
- आदर्श समाजसेवक व संस्थांचे कार्य समाजासमोर आणून नवीन पिढीला प्रेरित करणे.

---

## पात्रता निकष

| श्रेणी | पात्रता निकष |
|---|---|
| **अ) व्यक्तींसाठी** | १. अर्जदार भारतीय नागरिक असावा.<br>२. गंभीर फौजदारी गुन्ह्याची पार्श्वभूमी नसावी. |
| **ब) संस्थांसाठी** | १. संस्था अधिकृतरीत्या नोंदणीकृत असावी.<br>२. मागील लेखापरीक्षण (Audit Report) अनिवार्य. |

---

## अर्ज प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रे

**अर्ज प्रक्रिया:**

१. पुरस्कारासाठी सार्वजनिक जाहिरात/परिपत्रक प्रसिद्ध केली जाईल.

२. अर्ज विहित नमुन्यात आवश्यक कागदपत्रांसाह २ प्रतीमध्ये विद्यापीठास विहित मुदतीत करावेत.

३. अपूर्ण किंवा विहित नमुन्यात नसलेले अर्ज कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय रद्द केले जातील.

**आवश्यक कागदपत्रे (व्यक्ती/संस्था):**

- **व्यक्ती:** [आधार कार्ड रेडाक्टेड/वगळले], पॅन कार्ड, रहिवासी पुरावा, कार्याचा सविस्तर अहवाल, छायाचित्रे, शिफारस पत्रे आणि स्वघोषणापत्र.
- **संस्था:** नोंदणी प्रमाणपत्र, ट्रस्ट डीड, PAN/TAN, मागील वर्षांचे ऑडिट रिपोर्ट्स, वार्षिक अहवाल.

---

## समिती रचना व कार्यपद्धती

**१. छाननी समिती (Scrutiny Committee):**

- **कार्य:** अर्जांची प्राथमिक तपासणी, कागदपत्रांची वैधता तपासणे आणि पात्र/अपात्र यादी तयार करणे.

**२. निवड समिती (Selection Committee):**

- **कार्य:** छाननी समितीने शिफारस केलेल्या प्रस्तावांचे मूल्यांकन करणे आणि अंतिम पुरस्कारार्थींची निवड करणे.

---

## पात्रता रद्द करण्याचे अधिकार

खालील परिस्थितीत अर्ज अपात्र ठरविण्याचा अधिकार विद्यापीठाकडे राहील:

१. अर्जात खोटी किंवा बनावट माहिती सादर केल्यास.

२. गुन्हे किंवा आर्थिक अपहारात सहभाग आढळल्यास.

३. शासनाकडून किंवा न्यायालयाने काळ्या यादीत (Blacklist) समावेश केल्यास.

---

## गोपनीयता, नैतिकता व कायदेशीर अधिकार

- **गोपनीयता:** निवड प्रक्रियेतील सर्व माहिती गोपनीय राहील.
- **हितसंबंध संघर्ष (Conflict of Interest):** समिती सदस्याचे नातेवाईक अर्जदार असल्यास, त्या सदस्याने निर्णय प्रक्रियेतून बाजूला होणे बंधनकारक आहे.
- या प्रक्रियेबाबत कोणताही वाद उद्भवल्यास अंतिम निर्णय मा. कुलगुरू यांचे असतील.

---

## निष्कर्ष

सदर नियमावली निष्पक्षता आणि गुणवत्तेच्या आधारावर पुरस्कार प्रदान करण्यासाठी कटीबद्ध आहे. विद्यापीठाचा निर्णय अंतिम आणि सर्वांवर बंधनकारक राहील.

************

DRAFT

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ**

**१ नाथीबाई ठाकरसी रोड, न्यू मरीन लाईन्स, चर्चगेट, मुंबई-४०० ०२०**
**भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे पुरस्कार-२०२५**

**(अर्ज नमुना)**

पासपोर्ट साईज फोटो
(अर्जदाराचा)

**अर्जदाराचा प्रकार :** □ व्यक्ती □ संस्था / संघटना / मंडळ / स्वयंसेवी संस्था

---

**अर्जदाराची सविस्तर माहिती**

**अ) व्यक्ती असल्यास :**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | अर्जदाराचे संपूर्ण नाव | |
| २ | जन्मतारीख व वय | |
| ३ | संपूर्ण पत्ता | |
| ४ | मोबाईल क्रमांक | |
| ५ | ई-मेल आयडी | |
| ६ | शैक्षणिक पात्रता | |
| ७ | व्यवसाय / पद | |
| ८ | कार्यक्षेत्र | |
| ९ | कार्याचा एकूण अनुभव | |
| १० | कार्य सुरू केल्याचे वर्ष | |
| ११ | कार्याचे मुख्य क्षेत्र (योग्य निशाणी (√) करावी) | कार्याचे मुख्य क्षेत्र १. शिक्षण □ २. सामाजिक कार्य / समस्या निवारण □ ३. महिला सबलीकरण : (अ) महिलांसाठीचे काम □ (ब) महिलांनी केलेले काम □ ४. अर्थकारण □ ५. प्रशासन / संरक्षण □ ६. विज्ञान आणि संशोधन □ |

**ब) संस्था असल्यास :**

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १ | संस्थेचे नाव | |
| २ | संस्थेचा स्थापना दिनांक | |
| ३ | संस्थेचा नोंदणी क्रमांक | |
| ४ | नोंदणी कायद्याचे नाव | |
| ५ | संस्थेचा पूर्ण पत्ता | |
| ६ | संपर्क क्रमांक | |
| ७ | ई-मेल / वेबसाईट | |
| ८ | अध्यक्ष / सचिव यांचे नाव | |
| ९ | संस्थेचे कार्यक्षेत्र | |
| १० | पुरस्काराची संख्या | |
| ११ | संस्थेचा कार्यकाल | |

- ❖ अर्जदार व्यक्ती अथवा संस्थेने राबविलेल्या किंवा सध्या राबवित असलेल्या सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, महिला सक्षमीकरण, आरोग्य, पर्यावरण, ग्रामीण विकास तसेच इतर समाजोपयोगी योजना, उपक्रम व कार्यक्रमांची माहिती किमान 1000 शब्दांमध्ये स्वतंत्र अहवालाच्या स्वरूपात सादर करावी.

- ❖ सदर अहवालामध्ये उपक्रमाचे उद्दिष्ट, कार्यपद्धती, लाभार्थी, समाजावर झालेला परिणाम, प्राप्त यश व विशेष बाबी यांचा समावेश असावा. तसेच आवश्यकतेनुसार संबंधित छायाचित्रे, वर्तमानपत्रातील बातम्या, टिपणी लेख, प्रमाणपत्रे व इतर पूरक कागदपत्रे अर्जासोबत जोडावीत – व्यक्तीने किंवा संस्थेने केलेल्या उपक्रमाचा व कार्यअहवाल.

**प्राप्त पुरस्कार / सन्मान (मागील २ वर्षातील पुरस्कारांची माहिती)**

| अ.क्र. | पुरस्काराचे नाव | पुरस्कार देणारी संस्था | वर्ष |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | | | |

**पडताळणीकरिता आवश्यक कागदपत्रे**

**अ) व्यक्तींसाठी आवश्यक कागदपत्रे :**

- ☐ ओळखपत्र प्रत (उदा. पॅन कार्ड)
- ☐ [आधार कार्ड प्रत]
- ☐ रहिवासी पुरावा
- ☐ शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रे
- ☐ इतर पूरक कागदपत्रे असल्यास

**ब) संस्थांसाठी आवश्यक कागदपत्रे :**

- ☐ संस्था नोंदणी व ट्रस्ट कागदपत्रे
- ☐ 80G / 12A प्रमाणपत्र (लागू असल्यास)
- ☐ मागील वर्षांचे लेखापरीक्षण (Audit) व वार्षिक अहवाल
- ☐ उपक्रमांची/कार्याची माहिती पुस्तिका व छायाचित्रे
- ☐ पूरक कागदपत्रे

---

**घोषणापत्र**

मी / आम्ही सादर केलेली माहिती खरी व अचूक असल्याचे घोषित करतो / करते. चुकीची माहिती आढळल्यास अर्ज रद्द करण्याचा अधिकार विद्यापीठास राहील.

**दिनांक :** ______________________

**ठिकाण :** ______________________

**अर्जदाराची सही :** __________________

**नाव :** ____________________________

(संस्था असल्यास पदाधिकारी यांचे नाव व सही शिक्का)

---

**सही व शिक्का :** ______________________________

**दिनांक :** _______________